सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

**पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य**

**महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१**

---

क्र. पोमसं /३६/ र. व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०१/२०२३, मुंबई, दिनांक ०४/०८/२०२३

**संदर्भ :-** महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्र. पोलीस-१८१९/प्र.क्र.२१४/पोल-५अ, दिनांक ०२ ऑगस्ट, २०२३.

**विषय :-** " शिक्षण सेवक, " प्राथमिक शिक्षण " व " सहशिक्षक " या पदावर केलेली पूर्वसेवा " पोलीस उप निरीक्षक " पदाच्या सेवेस जोडून देणेबाबत... श्री. श्रीकांत माधवराव इंगोले, सहायक पोलीस निरीक्षक

******

**परिपत्रक -**

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्र. पोलीस-१८१९/प्र.क्र.२१४/पोल-५अ, दिनांक ०२ ऑगस्ट, २०२३. ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२३०८०३१०४९३९३५२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

( प्रविण शिखरे )
पोलीस महासंचालक यांचे उप सहायक(र.व.का.),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

अपर पोलीस महासंचालक (आस्थापना /प्रशासन), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
पोलीस अधीक्षक, यवतमाळ

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके मध्ये " आस्थापना " या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.



Scanned with CamScanner

"शिक्षण सेवक, "प्राथमिक शिक्षक" व "सहशिक्षक" या पदावर केलेली पूर्वसेवा "पोलीस उप निरीक्षक" पदाच्या सेवेस जोडून देणेबाबत...
श्री.श्रीकांत माधवराव इंगोले, सहायक पोलीस निरीक्षक

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
**शासन निर्णय क्रमांकः पोलीस-१८१९/प्र.क.२१४/पोल-५अ**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक :- ०२ ऑगस्ट,२०२३

<u>वाचा :-</u>

१) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांचे आदेश क्र. जा.क्र. /जिपना/शिअ/प्रा-१/०३/६३७९, दि.०७.०७.२००३
२) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांचे आदेश क्र. जा.क्र. /जिपना/शिअ/प्रा-१/१०८२४/०६, दि.१७.१०.२००६
३) गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती हादगांव यांचे आदेश जा.क्र./ पसह/ ग.शि.अ./ आस्था २००/५५२, दि.२९.०४.२०१०
४) विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना), पोलीस महासंचालक कार्यालय,मुंबई यांचे पत्र क्र. पोमसं/५/१०/पोउनि-रासे-२००८/११४/२०११, दि.१६.०९.२०११
५) पोलीस अधीक्षक, नांदेड यांचे पत्र क्र. पव्यशा-१/पोउपनि-निवड/२००/११, दि.२०.०९.२०११
६) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद ,नांदेड यांचे पत्र जा.क्र.जिपनां/शिअ/प्रा-१/२०११/१०२५ दि.२८.०९.२०११
७) पोलीस उपमहानिरीक्षक व उपसंचालक, महाराष्ट्र पोलीस अकॅडमी, नाशिक यांचे आदेश क्र. आस्था-२/सत्र१०६ (DN) /नियुक्ती-२०११/४२२७, दि.३१.१२.२०११
८) विशेष पोलीस महानिरीक्षक, कोल्हापूर परिक्षेत्र यांचे आदेश क्र. ई-१/ प्रलि (१३-सी-ससे)/२०१३-८१११, दि.३१/०८/२०१३
९) वित्त विभाग,शासन परिपत्रक क्र.अंनियो-१००६/८७/सेवा-४, दि. १२.०१.२००७
१०) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.सेनिवे-१००८/९६/सेवा-४, दि.३.११.२००८
११) वित्त विभाग,शासन परिपत्रक क्र.अंनियो-१००९/३२/सेवा-४,दि.१८.८.२००९
१२) वित्त विभाग,शासन निर्णय क्र. सेनिवे १००८/प्र.क्र. १६/सेवा ४, दि.१९.०७.२०११
१३) वित्त विभाग, शासन निर्णय क्र.सेनिवे १००८/प्र.क्र.१६/सेवा ४,दि. ३.०८.२०११
१४) वित्त विभाग,शासन परिपत्रक क्र.सेनिवे-१००८/१६/सेवा-४,दि. २८.०९.२०१२
१५) विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना), पोलीस महासंचालक कार्यालय,मुंबई यांचे पत्र क्रमांक-पोमसं/५/१०/सेवा जोडून (इंगोले)/११४/२०१९, दि.२६.०६.२०१९

Scanned with CamScanner

**<u>प्रस्तावना:-</u>**

श्री. श्रीकांत माधराव इंगोले, यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोग पुरस्कृत "पोलीस उप निरीक्षक" पदावर निवड झाल्यानंतर पोलीस महानिरीक्षक व उपसंचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक यांच्या दि.३१.१२.२०११ रोजीच्या आदेशानूसार श्री.इंगाले यांना महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक येथे प्रशिक्षणार्थी पोलीस उपनिरीक्षक म्हणून दि.२६.०९.२०११ रोजी नेमणूक दिली.तद्‌नंतर पोलीस उपमहानिरीक्षक,कोल्हापूर परिक्षेत्र, कोल्हापूर यांच्या दि.३१.०८.२०१३ रोजीच्या आदेशानुसार श्री. श्रीकांत माधराव इंगोले यांची पोलीस उप निरीक्षक पदावर नियमीत नियुक्ती करण्यात आली.

श्री. श्रीकांत माधराव इंगोले यांची पोलीस उपनिरीक्षक पदावर नियुक्ती होण्यापूर्वी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांच्या दि.०७.०७.२००३ रोजीच्या नियुक्ती आदेशान्वये श्री. श्रीकांत माधवराव इंगोले यांची प्राथमिक शाळा, नेवरी/कोळी, पंचायत समिती-हदगाव, जिल्हा-नांदेड येथे शिक्षण सेवक या पदावर नियुक्ती करण्यात आली होती. तद्‌नंतर श्री.इंगाले यांनी दि.१४.०७.२००३ ते दि.१३.०७.२००६ या कालावधीत मानधनावरील शिक्षण सेवक पदाची तीन वर्षाची सेवा पूर्ण केल्यानंतर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नांदेड यांच्या दि.१७.१०.२००६ रोजीच्या आदेशान्वये श्री. इंगोले यांना प्राथमिक शिक्षक या पदावर नियमित नियूक्ती देण्यात आली.

प्राथमिक शिक्षक या पदावर कार्यरत असताना श्री.इंगोले यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून घेण्यात येणा-या पोलीस उप निरीक्षक पदाच्या परीक्षेस बसण्यास पूर्वपरवानगी देणेबाबत शिक्षणाधिकारी, प्राथमिक विभाग, जिल्हा परिषद नांदेड यांना विनंती केली होती.त्यानुषंगाने गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती हादगांव यांच्या दि.२९.०४.२०१० रोजीच्या आदेशान्वये श्री. इंगोले यांना पोलीस उप निरीक्षक पदाच्या परीक्षेस बसण्याची पूर्व परवानगी देण्यात आली होती.

तद्‌नंतर श्री. इंगोले यांची "पोलीस उप निरीक्षक" पदावर निवड झाल्यानंतर त्यांनी केलेल्या विनंतीनुसार श्री.इंगोले यांना मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांच्या दि.२८.०९.२०१० रोजीच्या आदेशानूसार दि.२३.०९.२०११ रोजी द्वितीय समयी कार्यमुक्त करण्यात आले व त्यानंतर ते पोलीस उप निरीक्षक पदाच्या प्रशिक्षणाकरिता महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक येथे हजर झाले .

श्री.श्रीकांत माधराव इंगोले, यांची "शिक्षण सेवक", "प्राथमिक शिक्षक" व "सहशिक्षक" पदाची पूर्वसेवा "पोलीस उप निरीक्षक" पदाच्या सेवेस जोडून देणेबाबतचा प्रस्ताव विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना), पोलीस महासंचालक कार्यालय यांनी संदर्भ क्र.१५ येथील दि.२६.०६.२०१९ रोजीच्या



Scanned with CamScanner

पत्रान्वये सादर केला आहे. त्यानुसार श्री. इंगोले यांची पूर्वसेवा जोडून देण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

**<u>शासन निर्णय :-</u>**

श्री. श्रीकांत माधराव इंगोले, हे वित्त विभागाच्या शासन निर्णय दि.१९.०७.२०११ मधील, वित्त विभागाच्या शासन परिपत्रक दि.१२.०१.२००७ मधील परिच्छेद क्रमांक २ व वित्त विभागाच्या शासन परिपत्रक दि.१८.०८.२००९ मधील परिच्छेद क्रमांक २ मध्ये नमूद केलेल्या (i) ते (iv) येथील अटींची पूर्तता करत असल्याने श्री. श्रीकांत माधराव इंगोले यांची दि.१४.०७.२००३ ते दि.२३.०९.२०११ या कालावधीतील "शिक्षण सेवक", "प्राथमिक शिक्षक" व "सहशिक्षक" या पदावरील सेवा दि.२६.०९.२०११ पासूनच्या पोलीस उपनिरीक्षक पदावरील सेवेस निवृत्तीवेतनाच्या प्रयोजनार्थ जोडून देण्यास तसेच श्री. इंगोले यांना महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन), नियम, १९८२ महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतनाचे अंशराशीकरण) नियम, १९८४ व सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना लागू करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर शासन आदेश वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्रमांक १९८/सेवा-७, दि.१४.०६.२०२३ अन्वये प्राप्त झालेल्या सहमतीनुसार निर्गमीत करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२३०८०३१०४९३९३५२९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

GAIKWAD
GANESH SUDAM

Digitally signed by GAIKWAD GANESH SUDAM
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA,
ou=HOME DEPARTMENT,
2.5.4.20=f88a2df366dbf702eda9179bfdd100f151490e69
1798947c7f6d1b8cf0dab7d6, postalCode=400032,
st=Maharashtra,
serialNumber=05B5EFA444AE7B29EC4D54E290F9F826C
6E4DE96799148FCFC4C6E13F203B34E, cn=GAIKWAD
GANESH SUDAM
Date: 2023.08.03 10:52:41 +05'30'

**( गणेश गायकवाड )**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. अपर पोलीस महासंचालक (आस्थापना), पोलीस महासंचालक कार्यालय,मुंबई
३. अपर पोलीस महासंचालक (प्रशासन), पोलीस महासंचालक कार्यालय,मुंबई
४. विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना), पोलीस महासंचालक कार्यालय,मुंबई
५. पोलीस अधीक्षक, यवतमाळ
६. महालेखापाल (लेखा परीक्षा व लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१/२ , मुंबई/नागपूर



Scanned with CamScanner

७. जिल्हा कोषागार अधिकारी, यवतमाळ

८. श्री. श्रीकांत माधराव इंगोले, सहायक पोलीस निरीक्षक (पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्यामार्फत)

९. निवडनस्ती( पोल-५अ).



Scanned with CamScanner